# अंदमानची इतिहास दर्शिका

## (Ticket History)



# विनायक दामोदर सावरकर

यांची

# कारागृहातील इतिहासदर्शिका
(History Ticket)

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर

**www.savarkarsmarak.com**

# विनायक दामोदर सावरकर यांची
# कारागृहातील इतिहासदर्शिका
## (History Ticket)

बंदी क्र. ३२७७८ वर्ग सी.-३ बंदीगृह क्र. २ शेवटचा माळा

| **दिनांक** | विवरण |
|---|---|
| **२४-१२-१९१०** | पहिली जन्मठेप शिक्षा |
| **३०-१-१९११** | दुसरी जन्मठेप शिक्षा |
| **२७-६-१९११** | अंदमानात जाण्यासाठी ‘महाराजा’ नौकेवर चढविले. |
| **४-७-१९११** | अंदमानाच्या कारागृहात प्रवेश. |
| **४-७-१९११** | प्रतिदिन एक पौंड काथ्या कुटण्याचे काम दिले. |
| **१५-७-१९११** | कोठडीत बंद सहा महिन्यांसाठी. |
| **१-८-१९११** | दोरी काम दिले. |
| **१४-८-१९११** | बी.ए.ची उपाधी काढून घेतल्याचे शिक्षण सचिवाचे पत्र. |
| **१६-८-१९११** | हातकोलू १४ दिवसांसाठी. |
| **२९-८-१९११** | दोरीकाम. |
| **३०-८-१९११** | मुख्य आयुक्ताकडे सूट देण्याचे आवेदन. |
| **३-९-१९११** | आवेदनातील विनंतीस नकार. |
| **६-१२-१९११** | एक आण्याचे नाणे कागद, पेन्सिल जवळ बाळगली म्हणून समज. |
| **१५-१-१९१२** | अंधार - कोठडीतून सहा महिन्यांनीबाहेर काढले. |
| **९-५-१९१२** | अनुज्ञेवाचून दुसर्‍यांना लिहिलेले पत्र नि लिखाणाकरता लागणारे कागदपेन्सिल आदी सापडली. |
| **११-६-१९१२** | वरील अपराधाकरिता एक महिना एकांत कोठडी. |
| **११-७-१९१२** | एकांत कोठडीतून हालविले. |
| **७-९-१९१२** | दुसर्‍या बंद्यास लिहिलेले पत्र जवळ सापडले. |
| **१०-९-१९१२** | वरील अपराधासाठी सात दिवसांची खडी हातबेडी. |
| **१८-९-१९१२** | खडी हातबेडी पूर्ण. |

| | |
|---|---|
| **२९-१०-१९१२** | सोळा महिने अंधार-कोठडीत चांगली वर्तणूक असल्याने तेथून हलविण्यासाठी बंदीपालाची वरिष्ठांना सूचना. |
| **४-११-१९१२** | सूचना वरिष्ठांनी फेटाळली. |
| **२२-११-१९१२** | दुसर्यार कैद्याने लिहिलेले पत्र जवळ सापडले. |
| **२३-११-१९१२** | वरील अपराधासाठी एक महिना एकांतवासाची शिक्षा. |
| **२३-१२-१९१२** | एकांतवासातून सुटका |
| **३०-१२-१९१२** | दिवसभर अन्नग्रहणास नकार. |
| **३१-१२-१९१२** | अन्नग्रहणास नकार. |
| **१-१-१९१३** | पुन्हा तेच. |
| **२-१-१९१३** | सकाळी अन्नग्रहण केले. |
| **१८-२-१९१३** | दोरी काम. |
| **२-८-१९१३** | रुमाल मिळाला. (रुमाल ठेवणे हा अपराध!) |
| **२५-८-१९१३** | वरील अपराधासाठी समज दिली. |
| **१४-११-१९१३** | गृहखात्याच्या माननीय सदस्याने आवेदन पत्र लिहिण्यास अनुज्ञा दिली. |
| **१४-११-१९१३** | वैद्यकीय अधीक्षकाकडे ४ वाजताआवेदन पाठविले. |
| **१६-११-१९१३** | सर रेजीनाल्ड क्रॉडॉकपुढे अुभे केले. |
| **१६-१२-१९१३** | काम करण्याचे सर्वथैव नाकारले. |
| **१७-१२-१९१३** | वरील अपराधासाठी एक महिना एकांतवासाची शिक्षा.काम नाही, पुस्तके नाहीत. |
| **१७-१-१९१४** | दोरी वळण्याची शिक्षा रहित केली. |
| **८-६-१९१४** | काम करण्यास संपूर्ण नकार म्हणून हातबेड्या घालून सात दिवस अुभे राहण्याची शिक्षा. |
| **१५-६-१९१४** | १० वाजता वरील शिक्षा पूर्ण |
| **१६-६-१९१४** | काम करण्यास संपूर्ण नकार म्हणून चार महिने साखळदंड. (Chaingauge) |
| **१८-६-१९१४** | काम करण्यास संपूर्ण नकार. दहा दिवस खोडाबेडी. दहा वाजल्यापासून (Crossbar fetters) |
| **१९-६-१९१४** | दोरी वळण्याच्या कामाची मागणी. |
| **१९-६-१९१४** | मुख्य आयुक्त पत्र १७८/२९, ४८ क्रमांक प्रमाणे मागण्यासंमत करता येत नाही. |
| **२६-६-१९१४** | मुख्य आयुक्त क्र. १९४/२९, ४८ दि. २५-६-१९१४ प्रमाणे बंदीवानाचे आवेदन मिळाले. |
| **२६-६-१९१४** | आणि परत कामावर आल्याविषयी मुख्य आयुक्तांनी अभिनंदन केले. |

www.savarkarsmarak.com

| | |
|---|---|
| **२९-६-१९१४** | खोडाबेडी काढली. |
| **१०-९-१९१४** | मुख्य आयुक्ताला आवेदन करण्याची अनुज्ञा मागितली. |
| **१४-९-१९१४** | वैद्यकीय अधीक्षकाचे द्वारा आवेदन पाठविले. |
| **१६-१०-१९१४** | चार महिन्यांनंतर साखळदंड काढला. |
| **१-१२-१९१४** | आवेदनातील सूचना सरकारने नाकारली. |
| **१८-५-१९१५** | रूग्णालयात प्रवेश दिला आणि बेडी काढली. |
| **२१-५-१९१५** | दोरी वळण्याचे काम. |
| **१७-३-१९१६** | धोतराला कापडाचा तुकडा लावला म्हणून समज. |
| **८-८-१९१६** | दुसरा वर्ग मिळण्यासाठी आवेदन. |
| **१४-८-१९१६** | मुख्य आयुक्तांना पत्र - १२४ |
| **१६-८-१९१६** | त्यानुसार मिळालेल्या उत्तरात म्हटले की, भारतीय बंदीवासात सहा महिन्यांपेक्षा अल्पकाळ ठेवण्यात आल्यामुळे अंदमानमध्ये आलेल्या दिवसापासून शिक्षेचा काल मोजून दुसरा वर्ग देण्यात येतो. |
| **२-११-१९१६** | दुसरा वर्ग दिला. |
| **३-८-१९१७** | कामावर असलेल्या रात्रपाळीच्या पहारेकर्यांची आज्ञा न ऐकल्यामुळे समज. |
| **२-१०-१९१७** | हिंदुस्थान सरकारला आवेदन करण्याची अनुज्ञा. |
| **१-२-१९१८** | मुख्य आयुक्त पत्र क्र. १२६४, दि. ३१-१-१९१८ वरून कळविण्यात आले की, सर्व राजकीय कैद्यांना मोकळे करण्यासंबंधी आवेदन हिंदुस्थान राज्य सचिवालयाकडे पाठवले. |
| **१-१-१९१९** | पथ्य नि औषधोपचारासाठी रुग्णालयातच ठेवावे. |
| **१-४-१९१९** | अन्न नि औषधोपचारासाठी रुग्णालयात ठेवले. तेथे त्यांनी क्र. ५ चे चाळीत वरचे बाजूचे कोपर्याठतील खोलीत राहिले पाहिजे नि काम चालू नसेल त्या वेळात त्यांना मानवेल अशा ठिकाणी गच्चीवर अथवा खालील अंगणात थोडा वेळ व्यायाम करण्याची अनुज्ञा दिली. |
| **३०-५-१९१९** | पत्नी नि बंधू डॉ. सावरकर यांची एक तास भेट. |
| **३१-५-१९१९** | पत्नी नि बंधू डॉ. सावरकर यांची सव्वा तास भेट. |
| **२४-१-१९२०** | कारागृह समितीकडे आवेदन करण्याची अनुज्ञा. |
| **६-४-१९२०** | भारत शासनाकडे पाठविण्याचे आवेदन मुख्य आयुक्तांकडे पाठविले नि दि. १२-४-१९२०ला ते भारत शासनाकडे पाठविले. |
| **१४-७-१९२०** | गच्चीमध्ये लेखनिकाचे काम करण्याची अनुज्ञा. |
| **१९-८-१९२०** | हिंदुस्थान सरकारचे निवेदन की व्हॉईसरॉय सर्वसाधारण युद्ध-विजयाच्या क्षमेचा लाभ सावरकर बंधूंना देण्यास सिद्ध नाही. |

| | |
|---|---|
| **२८-९-१९२०** | सावकरांनी इच्छा दर्शविली की त्यांना मुकादम (फोरमन) करावे अथवा लिखाणाचे काम द्यावे. पहिली मागणी मान्य करणे तूर्त शक्य नाही, दुसरी मागणी मात्र शक्यतोवर मान्य करावी. |
| **४-११-१९२०** | मुख्य आयुक्ताची आज्ञा दि. ३-११-२० प्रमाणे सावकरांना तेलकोठारावर मुकादम नेमले. |
| **२१-१-१९२१** | मुख्य आयुक्त पत्र २००५ दि. १९-१-२१ प्रमाणे बिल्ला काढून घेतला. |
| **१०-२-१९२१** | तीन महिने समाधानकारक काम केल्यामुळे पक्का करण्यात आल्याचे मुख्य आयुक्ताकडे पत्र क्र. ३७५ ने कळविले. |
| **२-५-१९२१** | मुंबईला पाठवण्याकरता महाराजा नौकेवर धाडले. |

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक